गुरुवार, दि. १० जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३३४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## टेंभुर्णी ग्रामपंचायतीला नगरपंचायतचा दर्जा न दिल्यास मतदानावर बहिष्कार

### टेंभुर्णीकर ग्रामस्थांचे निवेदन

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी** - जाफराबाद तालुक्यातील महत्त्वाची असलेल्या टेंभुर्णी ग्राम पंचायतीला नगरपंचायतचा दर्जा मिळवा यासाठी ग्रामस्थांनी एल्गार पुकारला असुन टेंभुर्णी शहर बंद ठेवून येणाऱ्या जि.प.पंचायत समीती, ग्राम पंचायत निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेण्यात आला असून तसे निवेदन जाफराबाद पंचायत समितीचे गटविकास अधिकारी नारायण खिल्लारे, जाफराबाद तहसीलदार सारीका भगत यांना लेखी निवेदन देवून इशारा देण्यात आला आहे. याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, टेंभुर्णी नगरपंचायतीला दर्जा देण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयाने बहुमताने दि.२८ एप्रिल २०२५ रोजी ठराव क्रमांक ०७ प्रमाणे मंजुरी दिलेली असुन त्यानुसार समस्त गावकरी मंडळीने पंचायत समिती व जिल्हा परिषदेला रितसर निवेदन दिलेले होते.यामध्ये दि.२० मे २०२५, दि. २८ मे २०२५,दि.३ जुन २०२५ रोजी निवेदन सादर केले होते.त्यानुसार विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांनी मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना यांना संदर्भ क्रमांक ०१ नुसार वस्तूस्थीती दर्शक तपशीलवार सध्या स्थितीचा अहवाल नुसार शासनास पाठविण्याचा आदेश दिले होते.त्यानुसार ग्राम विकास अधिकारी यांना संदर्भ क्रमांक ०२ नुसार प्रपत्रामध्ये चार प्रतीत प्रस्ताव तयार करून पाठविण्याचे आदेश केलेले असून त्यांनी विस्तार अधिकारी पंचायत यांची विशेष नियुक्ती केलेली आहे. पण मुद्दामहून राजकीय द्वेषापोटी ग्रामविकास अधिकारी जगदीश आढाव हे बळी पडले असुन सदर प्रस्ताव देण्यास जाणुनबुजून



विलंब करीत असल्याने जनतेचा रोष वाढतच चालला आहे..जिल्हा परीषद निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ग्राम विकास अधिकारी राजकीय दबावामुळे हा प्रस्ताव लांबणीवर टाकीत आहे.हा प्रस्ताव संबंधित संस्थेला दि.१५ जुलै २०२५ रोजी पर्यंत सदर प्रस्ताव प्रपत्रामध्ये चार प्रतीत दाखल करण्याचे आदेश करावे नसता आम्ही सर्व ग्रामस्थ गावकरी मंडळी लोकशाही मार्गाने गावबंद करून येत्या निवडणुकीत बहीष्कार टाकु असा इशारा टेंभुर्णीचे माजी सरपंच विष्णू जमधडे, जनार्धन झोरे , सर्जेराव कुमकर, ॲड. किशोर गायकवाड, संजय राऊत, रामेश्वर खांडेभराड, मनोहर जाधव,दत्तु सुद्रीक, विष्णू मगर, अंकुश देशमुख,शेख बाबु, सुनील देशमुख, भगवान देशमुख, जगनराव डोमाळे, मुश्ताक बागवान, मन्सुर बागवान, शंकर भागवत, ज्ञानेश्वर उखर्डे,पी.जी.तांबेकर , बालाजी मुळे, भाऊसाहेब अंभोरे,महादु धनवई, संतोष शिंदे, रवी खरात, किसन मघाडे, प्रदीप मघाडे, गौतम छडीदार, किसन जोशी, रंगनाथ जोशी यांनी दिलेल्या निवेदनात सह्या असुन या निवेदन जालना जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय आयुक्त, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पंचायत राज अध्यक्ष आमदार संतोष दानवे यांना देण्यात आलेल्या आहे.

## अंशतः अनुदानित शिक्षकांच्या शाळा बंद आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद




**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** दि. १४ ऑक्टोंबर २०२४ च्या शासन निर्णयासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद गेल्या तीन अधिवेशनात राज्य सरकारने केली नसल्याने संतप्त झालेल्या राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांनी शिक्षक समन्वय संघाच्या माध्यमातून पुकारलेल्या शाळा बंद आंदोलनाला जाफराबाद तालुक्यात मंगळवारी ता. ८ उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अंशतः अनुदानित सर्व प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आणि महाविद्यालय शंभर टक्के बंद होते. मुंबई येथील आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनात जाफराबाद तालुक्यातील सर्व अंशतः अनुदानित प्राथमिक माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय आणि काही विद्यालयातील तुकड्यावर कार्यरत शिक्षक शिक्षिका सहभागी झाले आहेत.

१० ऑक्टोंबर २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर राज्यातील ६३ हजार शिक्षकांना वेतन अनुदानाचा पुढील वाढीव टप्पा देण्यासाठी १४ ऑक्टोबर २०२४ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला परंतु या शासन निर्णयासाठी लागणाऱ्या सुमारे ११०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद विधिमंडळाची तीन अधिवेशने होऊन गेली तरी शासनाने शिक्षकांच्या तोंडाला पाणे पुसली असल्याने व सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनातं दि.३० जून रोजी सादर झालेल्या राज्याच्या पुरवणी मागण्यांमध्ये या शासन निर्णयासाठी सरकारने निधीची तरतूद न केल्याने राज्यातील शिक्षक संतप्त झाले आहे.

त्यामुळे शिक्षक समन्वय संघाच्या वतीने दि. ८ व ९ जुलै रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन पुकारण्यात आले आहे. मंगळवारी आंदोलनाच्या पहिल्या दिवशी जाफराबाद तालुक्यातील अंशतः अनुदानित सर्व शैक्षणिक संस्था बंद होत्या. राज्यभरातून अंशतः अनुदानित हजारो शिक्षक आझाद मैदानावर जमले असून यामध्ये जाफराबाद तालुक्यातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झालेले आहेत. या आंदोलनात जाफराबाद येथील फातेमाबी उर्दू माध्यमिक विद्यालय, ज्ञानसागर माध्यमिक विद्यालय सिपोरा अंभोरा व जाफराबाद, समर्थ माध्यमिक विद्यालय, जिजामाता माध्यमिक विद्यालय हनुमंतखेडा, राजे संभाजी माध्यमिक विद्यालय बेलोरा, भास्करराव शिंदे माध्यमिक विद्यालय माहोरा, न्यू हायस्कूल जाफराबाद, भास्करराव शिंगणे विद्यालय पापळ, जय भवानी विद्यामंदिर देवळेगव्हाण, राजे संभाजी विद्यालय जवखेडा, आयेशा उर्दू हायस्कूल टेंभुर्णी, सेट एकनाथ भगवानदास काबरा मराठी आणि उर्दू माध्यमिक विद्यालय टेंभुर्णी,

**पान ३ वर**

युवा आदर्श

गुरु कार्ड ...

शिक्षक आधारकार्ड
कुठेही सहज चालते
परवलीचे शब्द सार्थ
विक्रम करते भलते
सरकारी योजना नदी
गावा गावात पोचते
योग दान शिक्षकांचे
सांगा कुणास रूचते
शिकवता तल्लीनते
शारदा प्रसन्न हसते
श्रीगणेश सहस्त्र कला
समोर जागृत दिसते
रे लोकल ते ग्लोबल
त्यांनी बनविले रस्ते
अद्ययावत तंत्रज्ञान
बनले समर्थ फरिस्ते
इव्हेंट साजरे करता
का वेठी धरले जाते
शिक्षक अन् विद्यार्थी
कधी न विसरते नाते
कृतज्ञता व्यक्त करी
भरते ये उत्सवा पुरते
शिकून तुम्ही मोठे व्हा
आदर्श गुरुस हे पुरते

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

## विजेचे जाळे निर्माण करून शेतकऱ्यांना दिवसा आणि मुबलक वीज मिळवून देण्यासाठी सदैव प्रयत्नशील - आमदार बबनराव लोणीकर

### मंठा तालुक्यातील पेवा येथे ३३ केव्ही मंजूर; शेतकऱ्यांनी मानले लोणीकरांचे आभार

मंठा । प्रतिनिधी - माजीमंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या प्रयत्नाला यश आले असून मंठा तालुक्यातील पेवा येथे ३३ केव्ही उपकेंद्र मंजूर करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना सिंचनासाठी वीज ही अत्यावश्यक आहे. ही गरज ओळखून नवीन उपकेंद्र उभारणीसाठी आपण मागील अनेक दिवसापासून प्रयत्नशील होतो त्या प्रयत्नांना यश आले असून शेतकऱ्यांना मुबलक वीज मिळावी यासाठी आणखी एक ३३ केव्ही उपकेंद्र मंजूर करू शकलो याचा मला अभिमान आहे असे प्रतिपादन आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

पेवा येथे नव्याने उभारण्यात येणाऱ्या या उपकेंद्राच्या उभारणीसाठी रस्त्यालगत ०४ हजार चौरस मीटर जागा आवश्यक असून सुधारित वितरण क्षेत्र योजना सुधारणा अधिष्ठित आणि निष्पती आधारित योजना (RDSS) योजने अंतर्गत पेवा येथे सदरील ३३ केव्ही उपकेंद्राला मंजुरी देण्यात आली आहे. गावामध्ये जागा विकत देऊ इच्छिणाऱ्या जागा मालकांनी आपले निवेदन जागेच्या तपशिलासह व प्रमाणित कागदपत्रासह दिनांक १८.०७.२०२५ रोजी संध्याकाळी ०५ वाजेपर्यंत बंद लिफाफ्यात सादर करावेत असे आवाहन देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे.



**शेतकऱ्यांनी मानले लोणीकरांचे आभार**

माजीमंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून पेवा येथे ३३ केव्ही मंजूर केल्याबद्दल पेवा, किर्तापूर अंभोरा शेळके किनखेडा पांगरा गडदे आंदवाडी खोरवड येथील शेतकऱ्यांनी समाज माध्यमांद्वारे तसेच प्रत्यक्ष फोनवरून आमदार बबनराव लोणीकर यांचे अभिनंदन केले. लवकरच ३३ केव्ही चे काम सुरू हो शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात मिळेल अशी अपेक्षा परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

या ३३ केव्हीमुळे अनेक गावांचा विजेचे प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे. शेतकऱ्यांना दिवसा मुबलक वीज उपलब्ध होत नसल्याने रात्रीच्या वेळी शेताला पाणी द्यावे लागते. शेतकऱ्यांना दिवसा पूर्ण क्षमतेने मुबलक प्रमाणात वीज उपलब्ध करून देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असून त्यादृष्टीने विविध प्रकल्प राबविण्याचा आपला मानस आहे. अधिक स्वस्त आणि मुबलक प्रमाणात उपलब्ध होण्यासाठी शासनाकडून सौर ऊर्जा वीज निर्मिती करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी शासन स्तरावर अनेक महत्वाच्या योजना हाती घेतल्या आहेत. आगामी काळात सौर ऊर्जे सारख्या नैसर्गिक स्तोत्रातूनही मोठ्या प्रमाणात वीज उपलब्ध होण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्न करणार आहोत असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

**विजेचा प्रश्न सोडवण्यासाठी आमदार बबनराव लोणीकरांची मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मागणी**

पेवा येथे मंजूर करण्यात आलेल्या ३३ केव्ही व्यतिरिक्त परतूर विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांसह शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात वीज मिळावी यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मंजुरी सह निधी उपलब्ध करून देण्यासाठी मागणी केली

**पान ३ वर**

## ॲड निलेश हेलोंडे पाटील जालना जिल्हा दौऱ्यावर

**जालना । प्रतिनिधी -** कै. वसंतराव नाईक शेती स्वावंलबन मिशनचे अध्यक्ष ड निलेश हेलोंडे पाटील राज्यमंत्री दर्जा हे जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे. शुक्रवार दि. ११ जुलै २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता विश्राम भवन जालना येथे आगमन. दुपारी ४.०० वाजता मग्रारोहयो अंतर्गत शासकीय गायरान जमिनीवर चारा लागवडी संबंधी उपजिल्हाधिकारी (रोहयो) व तहसिलदार जालना यांनी सुचविलेल्या प्रस्तावीत चारा लागवडीच्या ठिकाणास भेट व पाहणी . सायंकाळी ६.०० वाजता सोईनुसार अमरावती मार्गे काटोलकडे प्रयाण करतील.

## जालना व परभणी येथे स्वतंत्र पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र द्या

### मॅन्युअल स्कॅव्हेंजिंग ऍक्ट २०१३ अंतर्गत व्हिजिलन्स कमिटीची मागणी

**परतूर । प्रतिनिधी -** समाज कल्याण सहा. आयुक्त एडके यांची प्रोफेसर्स फोरमचे प्रवर्तक प्रा. सिद्धार्थ पानवले, सजग नागरी मंच आणि सामाजिक कार्यकर्ता सिद्धार्थ इंगळे यांनी भेट घेऊन विविध मागण्यांवर चर्चा केली. सहाय्यक आयुक्त एडके यांच्यावर जालना आणि परभणी या जिल्ह्याची जबाबदारी आहे.

या भेटीत जालना व परभणी जिल्ह्यातील पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी समाज कल्याण संचलित स्वतंत्र पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, मॅन्युअल स्कॅव्हेंजिंग ऍक्ट २०१३ नुसार व्हिजिलन्स कमिटी स्थापन करण्याची मागणीही जोरकसपणे मांडण्यात आली. या दोन्ही मागण्यांना



आयुक्त एडके यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.सिद्धार्थ इंगळे आणि प्रा. सिद्धार्थ पानवले यांनी जालना व परभणी जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या मागास आणि सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना पोलीस भरतीसाठी दर्जेदार मार्गदर्शन मिळावे, यासाठी स्वतंत्र प्रशिक्षण केंद्राची गरज असल्याचे नमूद केले. या केंद्रांमुळे विद्यार्थ्यांची निवड होण्याची शक्यता वाढेल, असे त्यांनी सांगितले. तसेच, मॅन्युअल स्कॅव्हेंजिंग ऍक्ट २०१३ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व्हिजिलन्स कमिटी स्थापन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. ही कमिटी

**पान ३ वर**

## हिंदु जनजागृती समितीच्या वतीने ‘गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन !

**जालना । प्रतिनिधी -** संपूर्ण विश्व युद्धाच्या दिशेने जात आहे. भारतातही जिहादी आतंकवादी हिंदूंची हत्या करून भारताला युद्धाकडे ओढत आहेत. श्रीराम, श्रीकृष्ण या अवतारांपासून ते छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप यांनाही जनतेवरील अन्याय नष्ट करण्यासाठी युद्धच करावे लागले. त्या कार्यात त्यांना गुरुपरंपरेचेही मार्गदर्शन मिळाले. यातून राष्ट्ररक्षणासाठीही गुरु-शिष्य परंपरा आवश्यक आहे, हे लक्षात येते. त्यामुळे या वर्षी राष्ट्रप्रेम वाढवणारी गुरुपौर्णिमा साजरी करण्याच्या उद्देशाने हिंदु जनजागृती समितीच्या वतीने गुरुवार, १० जुलै या दिवशी ‘गुरुपौर्णिमा महोत्सवां’चे आयोजन करण्यात आले आहे. यंदा हा महोत्सव देशभरात ४५ ठिकाणी, तर जालना जिल्ह्यात दोन ठिकाणी होणार आहेत.

ब्राह्मण सभा भवन, महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या बाजूला, गांधी चमन ते रेल्वे स्टेशन रोड, जुना जालना येथे वेळ सायंकाळी ५.३० वाजता तर दक्षिण मुखी हनुमान मंदिर, हस्त पोखरी, ता.अंबड, जि. जालना येथे वेळ सायंकाळी ७ वाजता हा महोत्सव होणार आहे.


# गुरूंचे खरे स्वरूप

**शिष्याचा विश्वास** : 'गुरु विश्वासावर आहे. आपल्या विश्वासावर गुरूंची महती अवलंबून आहे. गुरु तुमच्यापण विश्वासावर आहे. तुमच्या विश्वासातच गुरु आहे.

**भावार्थ** : 'गुरु विश्वासावर आहे. आपल्या विश्वासावर गुरूंची महती अवलंबून आहे', यातील गुरु हा शब्द बाह्यगुरूंविषयी वापरलेला आहे. गुरूंवर विश्वास असेल तरच गुरु हे 'गुरु' म्हणून कार्य करू शकतात. 'गुरु तुमच्यापण विश्वासावर आहे. तुमच्या विश्वासातच गुरु आहे', यातील गुरु हे अंतर्यामी असलेले गुरु होत.'

**गुरुतत्त्व एकच** : सर्व गुरु जरी बाह्यतः स्थूलदेहाने निराळे असले, तरी आतून मात्र ते एकच असतात. ज्याप्रमाणे गायीच्या कोणत्याही आचळातून सारखेच शुद्ध आणि निर्मळ दूध येते, त्याचप्रमाणे प्रत्येक गुरूंमधील गुरुतत्त्व एकच असल्याने त्यांच्याकडून येणाऱ्या आनंदलहरी सारख्याच असतात. समुद्राच्या लाटा जशा किनार्याकडे येतात, तसेच ब्रह्म / ईश्वर यांच्या लाटा, म्हणजे गुरु, समाजाकडे येतात. सर्व लाटांतील पाण्याची चव जशी तीच असते, तसेच सर्व गुरूंतील तत्त्व एक म्हणजे ब्रह्मच असते. पाण्याच्या टाकीला लहान-मोठ्या बर्याच तोट्या असल्या, तरी प्रत्येक तोटीतून टाकीतीलच पाणी येते. विजेचे दिवे कितीही निरनिराळ्या आकाराचे असले, तरी वहाणार्या विजेमुळे निर्माण होणारा प्रकाशच त्यांतून बाहेर पडतो. तसेच गुरु बाह्यतः निरनिराळे दिसले तरी त्यांच्यातील गुरुतत्त्व, म्हणजेच ईश्वरीतत्त्व एकच असते.

गुरु म्हणजे स्थूलदेह नव्हे. गुरूंना सूक्ष्मदेह (मन) व कारणदेह (बुद्धि) नसल्याने ते विश्वमन आणि विश्वबुद्धीशी एकरूप झालेले असतात; म्हणजेच सर्व गुरूंचे मन अन् बुद्धि हे विश्वमन आणि विश्वबुद्धि असल्याने ते एकच असतात.



गुरु साधना सांगतात, ती करवून घेतात आणि मोक्षापर्यंत नेतात !

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'गुरुकृपायोग'**
**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

# गुरु पौर्णिमा; गुरु-शिष्य अतूट नातं

आज गुरुपौर्णिमा, गुरुपौर्णिमा म्हणजे गुरूंच्या प्रति लिन होण्याचा आणि गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. आषाढ महिन्यांत गुरु पौर्णिमा साजरी केली जाते. आषाढ शुद्ध पौर्णिमेला आपण गुरू पौर्णिमा किंवा व्यास पौर्णिमा म्हणतो. या दिवशी गुरुतत्व एक हजार एक हजार पटीने कार्यरत असते त्यासाठी शिष्य यादिवशी अखंड आपल्या गुरुसेवेत मग्न असतो. गुरू शिष्य नाते हे असे एक नाते आहे की ज्याला मर्यादा नाही. अखंड साधनेत कार्यमग्न असणे, गुरूंनी दिलेले नाम घेणे, गुरूंचा महिमा गाणे, प्रसंगी प्राणाचीही पर्वा न करता गुरू कार्य करणे, असं अतूट नातं म्हणजे गुरू शिष्याचं नातं.



गुरू शिष्य परंपरा हे आपल्या भारत देशाचं एक वैशिष्ट्य म्हटलं तरी वावगे ठरणार नाही. आपल्या देशात तर गुरुचे महत्व खुप आहे. गुरूला साक्षात देव मानणारी आपली संस्कृती आहे. म्हणूनच गुरुर ब्रह्मा। गुरुर विष्णू। गुरुर देवो माहेश्वरा। गुरू साक्षात परब्रह्म। तस्मई श्री गुरू देव नमः अशी आपण गुरूंची ओळख करून देतो. गुरू म्हणजे काय ? गुरूंचे महत्व काय? आपल्या जीवनात गुरूंचे असणे म्हणजे काय? या सगळ्या गोष्टींची उत्तरे एका लेखात मिळणे अशक्य आहे यास्तव थोडक्यात सांगायचे म्हणजे आपल्याला देव दाखवता येत नाही, पण गुरूंच्या माध्यमातून आपण देवालाच अनुभवत असतो. देवाने गुरूंच्या माध्यमातून केलेली कृपा अनुभवत असतो. गुरूंची लीला शब्दात मांडणे अशक्य आहे. म्हणून तर आपण दरवर्षी गुरूंविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी गुरुपौर्णिमा साजरा करतो. गुरू हा संतकुळीचा राजा। गुरू हा प्राण विसावा माझा। गुरुविण देवपूजा पाहत नाही त्रैलोकी। वरील काव्य पंक्तीतून गुरू शब्दाची महती येते. कारण गुरूला आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. गुरुच आपल्याला अज्ञानातून बाहेर काढतात. प्रथम आपण गुरु या शब्दाचा अर्थ समजून घेऊया. गु म्हणजे अंधकार आणि रु म्हणजे नाहीसे करणारा. गुरू आपल्याला जीवनातील विकारांचे अज्ञान दूर करून आनंदी जीवन कसे जगावे हे शिकवतात आणि प्रकाशाच्या म्हणजेच ज्ञानरुपी योग्य वाटेवर चालण्यास प्रवृत्त करतात. गुरू म्हणजे ज्ञानाचा अखंड झरा आहे. अंधकाराचा नाश करून प्रकाशाचा किरण देणारा गुरू असतो. एकदा का गुरू आपल्या आयुष्यात आले की त्यांची कृपा सतत आपल्यावर होत राहते. गुरूंनी सांगितलेली साधना सतत करणे हीच गुरूंविषयी खरी कृतज्ञता होय. गुरू आपल्यावर निरपेक्ष प्रेम करतात. त्यांना आपला शिष्य आपल्यापेक्षा मोठा झालेला पाहणे एव्हढेच अपेक्षित आहे. त्यासाठी ते आपल्या आपल्या शिष्यांना उत्तम असे ज्ञान देत असतात. जर उत्तम ज्ञान मिळवून उत्तम व्यक्ती म्हणून समाजात ज्ञान कमवायचे असेल तर जीवनात गुरुंना पर्याय नाही. माणसाच्या जीवनातील पहिले गुरू म्हणजे त्याचे आईवडील. आई ही तर आपल्या जीवनातील प्रथम आद्य गुरू. आई इतकं श्रेष्ठ दैवत या जगात नाही असं समर्थांनी लिहिले आहे. मूल जेंव्हा लहान असते तेंव्हा आईवडीलच त्याच्यावर संस्कार करीत असतात.त्याला छोट्या छोट्या गोष्टीतून जीवनात कसे वागायचे ते शिकवत असतात. आईवडील हेच तर आपले प्रथम गुरू असतात. म्हणून त्यांचा आदर करायला हवा. आईवडीलानंतर नंबर लागतो तो शिक्षकांचा त्यांचीही आपल्या जीवनात खूप महत्वपूर्ण भूमिका असते. मुलांवर योग्य आणि चांगले संस्कार करण्याचे, बाल मनाला पैलू पाडण्याचे काम शिक्षक करीत असतात. मुलांच्या जीवनाला खरा आकार शिक्षकच देत असतात. आईवडील आणि शिक्षकांनी कोऱ्या पाटीवर केलेले संस्कार कायमस्वरूपी टिकून राहतात मग ते चांगले असोत की वाईट. त्याचाच प्रभाव त्या मुलांच्या पुढील आयुष्यात कायम राहतात. आईवडील आणि शिक्षकच नव्हे तर जन्मापासून आपण आपल्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक गोष्टींपासून, व्यक्तींपासून काही ना काही तरी शिकतच असतो. प्रत्येक गोष्ट जी आपल्याला शिकवण देते ती गुरुच असते. उदाहरणार्थ- सूर्य, पृथ्वी, नदी, जल, वारा, अग्नी, झाडे, पाने, फुले, ढग, डोंगर निसर्गातील प्रत्येक गोष्ट आपल्याला काही तरी शिकवत असते. या सर्वांना आपण गुरुस्थानी मानून त्या प्रत्येक पदार्थांविषयी कृतज्ञता बाळगली पाहिजे. त्यांची देण्याची, त्यागाची, परोपकाराची वृत्ती आपण जोपासली पाहिजे. या सर्व गोष्टी जोपासण्यासाठी आपल्याला गुरूंची आवश्यकता असते.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# माझे वडील...

आज १० जुलै .या निमित्ताने मला माझ्या वडिलांची खूप आठवण येतेय. मी ३८ वर्षांपूर्वी नाशिक येथील पोलिस प्रशिक्षण केंद्रात ( पीटीसी) पोलिस उप निरिक्षक पदासाठी प्रशिक्षण घेत असताना, अचानक गेले तो हा दिवस. हा दिवस मी विसरू म्हणते तरी आज पर्यंत कधी विसरू शकले नाही, इतका या दिवसाने माझ्या आयुष्यावर खोलवर परिणाम केला आहे.

मी वडिलांना काका म्हणायचे आणि ते मला सुनील म्हणायचे. तिथेच माझ्या भविष्यातलीक पाळमुळं रुजली गेली होती असं मला वाटतं. काकांनी माझा पिंड चांगलाच ओळखला होता म्हणून जेव्हा मला कॉलेजला जायचं होतं आणि कोल्हापूरला बसने अपडाऊन करायचं होतं तेंव्हा काका म्हणाले, तुला वावगं काही आवडत नाही आणि तू रोज भांडण करून येशील. गाडीत वेगवेगळ्या प्रकारचे लोक येत असतात. मी काकांना वचन दिलं की मी कुणाशी भांडणार नाही, पण मला कॉलेज शिकू द्या. मला ग्रॅज्युएट होऊ द्या. मला नोकरी करायचे आहे.तेव्हा आमच्या घरात नोकरीची पार्श्वभूमी नव्हती. चांदीचा उद्योग आणि शेती या दोन्ही धंद्यांमध्ये रमलेले आमचे कुटुंब होते. त्यात मी नोकरीचा हट्ट धरलेला होता. काकांनी मला कॉलेजला घातलं. मी त्यांचा विश्वास सार्थ ठरवत १९८६ साली कोल्हापूर येथील राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज मधून बीकॉम झाले.

सुदैवाने १९८६ साली महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या महिला पोलीस उपनिरीक्षक या पदासाठी निघालेल्या जाहिरातीनुसार मी अर्ज केला. मूळची खेळाडू असल्याने मला पास होणं काही अवघड गेलं नाही आणि मी ६ जून रोजी काकांचा निरोप घेऊन नाशिकला जाणाऱ्या सटाणा गाडीत बसले .त्यावेळी काकांचा जो निरोप घेतला तो शेवटचा ठरेल असं स्वप्नातही वाटलं नव्हतं .पण दुर्दैवाने ते खरं ठरलं आणि १0जुलै १९८७ रोजी काका हृदय विकाराच्या झटक्याने गेले.

मला घ्यायला माझे भाऊजी पीटीसीत आले .त्यापूर्वी दोन दिवस आधी शुक्रवारी काका गेले त्याच दिवशी आम्हांला पीटीसी मध्ये गोड पदार्थ असायचा आणि नॉनव्हेज वाल्यांना नॉनव्हेज असायचं. मी शाकाहारी असल्याने मला गोड पदार्थ दिला होता. खरं म्हणजे गोड पदार्थ म्हणजे माझा आवडीचा विषय. पण त्या दिवशी का कोणास ठाऊक, मला गोड खावेसे वाटलं नाही . मी ते आणून रूममध्ये ठेवलं .रात्री त्याला मुंग्या लागल्या म्हणून दुसऱ्या दिवशी फेकून दिलं. थोड्याच वेळात मला सांगण्यात आले की तुमचे भाऊजी तुम्हाला भेटायला आलेले आहेत. मी त्यांना भेटायला गेले तर ते

मला म्हणाले ,सुनिता लगेच आवर. आपल्याला गावी जायचं आहे. माझ्या छाती

अचानक धडधडू लागली. म्हटलं काय झालं ? तर भाऊजी म्हणाले,काका आजारी आहेत आणि त्यांनी तुला भेटायला बोलावलेले आहे. मी म्हटलं काका असे कधीच बोलवणार नाहीत मला भेटायला. काय झाले सांगा आणि दुर्दैवाने तो धक्कादायक प्रसंग घडून गेला होता.

शुक्रवारी काकांचा दुर्दैवी अंत झाला होता. मी सटाण्यातून





नाशिक वरून सटाणा बसने पुन्हा कोल्हापूरहून हुपरी ला येत असताना मला काकांसारखी माणसं गाडीत दिसायला लागली .माझे चुलते जे होते त्यांना आम्ही म्हातारबाबा आणि काकांना त्यांची मुलं काका म्हणायची म्हणून म्हणून आम्ही मुलं देखील वडिलांना काकाच म्हणत असू. घरी आम्ही वडिल, आई, माझ्या आईची आई (आजी) माझ्या वडिलांची बहीण आणि माझा भाऊ आणि आम्ही आठ बहिणी, भावाची बायको, आणि त्याची तीन मुलं,गुरेढोरे असं मोठं खटलं असलेला आमचं कुटुंब. तरी देखील आम्ही चांदीचा व्यवसाय असताना व शेती असताना सुद्धा अतिशय साध्या घरात राहत होतो .काकांचं म्हणणं असायचं की ज्या मधून आपल्याला परतावा नसतो अशा मध्ये आपण पैसे खर्च करायचे नसतात. शिवाय एवढ्या मुलींची जबाबदारी देखील होती.

असं माझं बालपण गेलं. आज जेव्हा बालपण आठवतं, तेव्हा काकांचे एकेक गुण एकेक आठवतात. एकदा भावाला ते म्हणाले होते राम'हे शंभर रुपये काँग्रेसच्या शाखेत दे आणि त्यांच्याकडून पावती घेऊन ये. काँग्रेसच्या खर्चासाठी हे पैसे आपण देत असतो. तेव्हा मला काही त्याचा अर्थ कळला नव्हता. पण आज कळतं की कोणत्याही पक्षाला अर्थकारण चालवण्यासाठी निधी लागतो आणि आज आपण त्याचा पक्षनिधी कसा उभा राहत असतो ते पाहतो .असो .

माझे वडिल अतिशय दूरदर्शी होते. माझ्या मैत्रिणीला म्हणाले (कल्पना गाटला ) तू लॉ केलेले आहेस तर तू जज्ज साठी परीक्षा द्याव्या असं मला वाटतं. त्याप्रमाणे तिनं ते केलं आणि ती जज्ज झाली. काकांचं सामाजिक कार्य देखील दांडगं होतं. त्याकाळी पैसा फंड बँकेमध्ये एक कमिटी होती ज्याच्यामध्ये सामुदायिक विवाहाचे आयोजन केलं जायचं. काका त्या कमिटीचे सभासद होते कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त जोडप्यांचे लग्न मोफत लावून दिलं जायचं व त्यांना संसाररोपयोगी वस्तू देत. त्याचप्रमाणे ते ग्रामपंचायतचे पंच असताना देखील त्यांनी अतिशय चांगलं काम केलं होतं . गावामध्ये जेव्हा पण लग्न ठरवण्याचे असेल किंवा वाटणी करण्याची असेल अशी कोणतीही कामे असतील तेव्हा काकांना आग्रहाचं निमंत्रण असायचं की आपण यावं. काकांचा स्वभाव अतिशय रागीट असला तरी प्रांजळ सुद्धा तेवढाच होता. त्यांना गैर काहीच चालत नसे. नेमका हाच गुण माझ्यात सुद्धा आला, असं मला वाटतं. त्याचप्रमाणे काका म्हणायचे की धंद्यामध्ये म्हणजे आम्ही जो चांदीचा धंदा करत होतो तो ९७ टंच असलेला म्हणजे फक्त तीन टक्के त्यात आवश्यक (टंच) भेसळ असायची आणि अशा प्रकारे शुद्ध माल आपण ग्राहकांना पुरवला पाहिजे याबाबत ते आग्रही असायचे. जेव्हा कुणाला पूर्ण शुद्ध माल पाहिजे असल्यास आमचे स्पर्धक सांगत की तुम्ही कृष्णाजी कुलकर्णीच्या दुकानात जा तिथे तुम्हाला चोख वस्तू मिळेल. असं काकांनी ते नाव कमावलेलं होतं .सर्व जण काकांना के.एस म्हणायचे .कृष्णाची श्रीपाद कुलकर्णी हे हुपरीच्या चांदी बाजारपेठेतला एक नावाजलेलं नाव, खात्रीशीर दुकान होते.त्या काळी हुपरीच्या चांदी असोसिएशन तर्फे निवडक कारखानदारांचे चांदी व्यवसायातील वाटचालीचे पुस्तक प्रकाशित केले होते त्यात काकांवर लेख होता.आजही ते दुकान तिसऱ्या पिढीमध्ये माझ्या भाचे चालवत आहेत. वडिलांचे नंतर भाऊ आणि त्याच्यानंतर त्याची मुलं माझे भाचे आहेत ते काम सांभाळत आहेत .काका म्हणायचे की कोणताही व्यवसाय करताना त्याच्यामध्ये पत राखावी लागते आणि ती पत म्हणजे आपले वचन असते. आपले बोल राखायचे असतात. अशी पत सांभाळून कुठलाही व्यवसाय करावा असं त्यांचं प्रामाणिक मत होतं . त्यामुळे ते संस्कार आमच्यावर नकळत होत गेले .आपलं बोलणं म्हणजेच आपली पत असते आणि आणि पत म्हणजेच आपलं बोलणं आणि त्याप्रमाणे वागणं याबाबतचे बाळकडू आम्हाला काकांकडूनच मिळाले

आज वडिलांना जाऊन ३८ वर्षे झाली पण पोलीस ट्रेनिंगला जाताना वडिलांची निरोप घेतानाची मूर्ती आजही जशीच्या तशी मनात जिवंत आहे. काकांची कमतरता जाणवते .म्हणतात ना जे विधिलिखित असते ते होते. खरतर मी ट्रेनिंग ला गेल्यानंतर ठरविले होते पहिला पगार झाल्यानंतर त्यांच्यासाठी आरामखुर्ची घेऊ म्हणून. पण माझी ईच्छा अपुरीच राहिली. परंतु काकांचा



सहवास व सल्ला अधिक लाभला असता तर आज जीवन अधिक पारदर्शी असते. काका तुम्ही माझ्या हृदयात संस्कार रूपाने जिवंत आहात. आपली कमतरता आजही जाणवते काका. आपल्या स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली.

**सुनिता नाशिककर**
**सेवानिवृत्त**
**पोलीस उपअधीक्षक,**
**मुंबई.**

**संपादन - देवेंद्र भुजबळ**
**९८६९४८४८००.**

# शिक्षण क्षेत्रातील सर्वोत्तम गुरू, बबनराव गुळवे!

प्रत्येकाच्या आयुष्यात वेगवेगळ्या टप्प्यावर अनेक गुरु भेटतात. सर्वच गुरु आपल्याला प्रामाणिकपणे ज्ञान व संस्कार देण्याचे महत्त्वपूर्ण काम करतात.त्यांच्याकडून आपल्याला योग्य दिशा व योग्य मार्गदर्शन मिळते. जीवन जगण्याचा मूलमंत्र शिकायला मिळतो. जीवनात लवकर यश संपादन करायचे असेल तर आपल्याला गुरुचा सल्ला घेणे आणि गुरूच्या विचारानुसार चालणे अत्यंत गरजेचे असते. आतापर्यंत ज्यांनी ज्यांनी यशाला गवसणी घातली आहे, त्या सर्वांनी गुरुच्या विचारानुसार आणि मार्गदर्शनानुसार वाटचाल करून यशाला काबीज केले आहे. ज्याच्या आयुष्यात गुरु नाही, असा माणूस या पृथ्वीतलावर शोधूनही सापडणार नाही. आपल्या आयुष्यातील पहिले गुरु हे आपले आई-वडील असतात. प्रथम प्राधान्य गुरु म्हणून आपल्याला आई-वडिलांना द्यावे लागेल. कारण त्यांनी नकळत आपल्या बालमनावर चांगले संस्कार बिंबवलेले असतात. म्हणून त्यांना विसरणे कदापी शक्य नाही. घरातील आई-वडील व आजी-आजोबा, शाळेतील शिक्षक आणि गावातील वडीलधारी माणसे यांचा गुरु म्हणून आपल्या जीवनात मोलाचा वाटा असतो. आई-वडिलांच्या नंतर मला शालेय जीवनातील माझे गुरु म्हणून बबनराव गुळवे गुरुजी यांचा उल्लेख करावा वाटतो. कारण बबनराव गुळवे गुरुजी हे केवळ विद्यार्थ्यांचेच गुरु नाहीत. तर ते शाळेतील सहकारी शिक्षकांचे सुद्धा गुरू आहेत. ते आपल्या चालण्यातून, बोलण्यातून, अध्यापनातून व वर्तनातून नकळत विद्यार्थ्यांवर व सहकारी शिक्षकांवर संस्काराची छाप पाडत असतात. बबनराव गुळवे गुरुजी हे शिक्षकी पेशातील आदर्श शिक्षक व आदर्श गुरू आहेत. ते माझ्यासारख्या असंख्य विद्यार्थ्यांचे लाडके गुरु आहेत. एका गुरुमध्ये असणारे सर्व गुण बबनराव गुळवे गुरुजींमध्ये आहेत. गुणी, ज्ञानी व सर्वगुणसंपन्न गुरु म्हणून अनेक शिक्षक बबनराव गुळवे गुरुजींकडे आदराने बघतात. त्यांच्या हाताखालून गेलेला विद्यार्थी भविष्यात कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात यशस्वी झाल्याशिवाय राहत नाही. गुळवे गुरुजींचे अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात वेगवेगळ्या पदावर कार्यरत आहेत. गुळवे गुरुजींचे अनेक विद्यार्थी गुरु पौर्णिमेला व शिक्षक दिनी त्यांना प्रत्यक्ष भेटून मनःपूर्वक शुभेच्छा देऊन त्यांचे वंदन करतात. गुळवे गुरुजी गणित विषयाचे तज्ञ शिक्षक आहेत, आणि साहित्य क्षेत्रातील नामांकित व दर्जेदार लेखक आहेत. त्यांचे दररोज विविध वर्तमानपत्रात लेख छापून येतात. त्यांचे लेख वाचकांसाठी एक अनमोल ठेवा असतो. त्यांनी आतापर्यंत हजारो लेख लिहून विद्यार्थ्यांना व शिक्षकांना योग्य मार्गदर्शन केले आहे. शिक्षक कसा असावा याचे उत्तम उदाहरण गुळवे गुरुजींकडे बघितल्यावर आपल्याला कळते. अतिशय सुसंस्कारी, प्रचंड ज्ञानी, गुणी, चारित्र्यवान, निष्कलंक व निष्कपट असणारे त्यांचे व्यक्तिमत्व भल्या-भल्या शिक्षकांना थक्क करणारे आहे. म्हणूनच गुळवे गुरुजींना सहकारी शिक्षक सुद्धा गुरुचा दर्जा देऊन त्यांचा सन्मान करतात. त्यांनी विद्यार्थी घडवण्याचे काम तर केलेच आहे, पण शिक्षकांना सुद्धा घडवण्याचे काम गुळवे सर नकळत आपल्या वर्तनातून व अध्यापनातून करत असतात. मी सुद्धा गुळवे सरांचा विद्यार्थी आहे. गुळवे गुरुजी गणित विषयाचे तज्ञ शिक्षक आहेत. त्यांच्या हाताखाली आत्तापर्यंत हजारो विद्यार्थी घडले आहेत आणि वेगवेगळ्या क्षेत्रात दिमाखाने कार्य करत आहेत. मी गुळवे सरांचा विद्यार्थी दहावीला असताना गणित विषयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालो होतो. मी गुळवे सरांकडून दोन गोष्टींचे परिपूर्ण ज्ञान घेतले आहे. एक म्हणजे गणित विषयाचे आणि दुसरे म्हणजे लेख लिहिण्याचे. त्यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य उल्लेखनीय व प्रशंसनीय आहे. गुळवे सरांना त्यांच्या कार्याची दखल घेऊन आदर्श शिक्षक पुरस्काराने व महात्मा फुले पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्यांचे लेख वाचून कित्येक विद्यार्थी घडत आहेत. एकदा गुळवे सरांच्या सावलीत बसलेल्या माणसाला लवकर उठूच वाटत नाही. गुळवे सरांच्या लेखाच्या व अध्यापनाच्या आहारी गेलेला माणूस भविष्यात कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात यशस्वी झाल्याशिवाय राहत नाही. मी पण गुळवे सरांचे लेख वाचून साहित्य क्षेत्रात चांगल्या प्रकारे लेखन करत आहे. मी गुळवे सरांना गुरुस्थानी मानून त्यांच्या प्रत्येक लेखाचे तंतोतंत पालन करत असतो. ते आपल्या वर्तनातून आणि आपल्या लेखातून समाज मनावर प्रभाव पाडण्याचे काम करत असतात. त्यांचे लेख हे वैचारिक व प्रबोधनात्मक असतात. कोणालाही समजेल अशा साध्या व सोप्या भाषेत लिहिलेले असतात. असे सुसंस्कारी ज्ञानी, गुणी, चारित्र्यवान व आदर्श शिक्षक सध्या शिक्षण क्षेत्रात दुर्मिळ झाले आहेत. आणि व्यसनी, राजकारणी, कामचुकार व टाईमपास करणारे शिक्षक सध्या शिक्षण क्षेत्रात प्रचंड वाढले आहेत. अशा शिक्षकांमुळे शिक्षण क्षेत्राला कलंक लागत आहे. हा कलंक पुसून टाकण्याचे प्रामाणिक काम बबनराव गुळवे सरांसारखे आदर्श शिक्षक करत आहेत. म्हणून अशा प्रामाणिक व निष्कलंक शिक्षकांच्या कार्याला मनापासून सलाम करावा वाटतो. मी गुळवे सरांचा विद्यार्थी म्हणून भलेही कोणत्या क्षेत्रात नोकरीला लागलो नाही, पण त्यांचा विद्यार्थी म्हणून एक चांगला लेखक व कवी म्हणून सामाजिक क्षेत्रात स्वतःला झोकून देऊन काम करत आहे. हेच मला खूप मोठे काम वाटत आहे. आईवडील, आजी-आजोबा व गावातील वडीलधारी माणसे हे तर प्रत्येकाचे जीवनातील चांगले गुरु असतातच. पण मी माझ्या जीवनातील माझा खरा गुरु म्हणून आई-वडिलांच्या नंतर बबनराव गुळवे सरांना गुरुस्थानी मानतो. आणि या लेखाचा समारोप करताना मी प्रत्येक शिक्षकाला व विद्यार्थ्याला एवढेच सांगू शकतो की, आपण बाबांनो, आपण गुळवे सरांची प्रेरणा व आदर्श घेऊन शिक्षण क्षेत्रात सर्वोत्तम काम करावे. गुळवे सरांचे अध्यापन पहावे, त्यांचे लेख वाचावे, त्यांचे वर्तन आचरणात आणावे, आणि शिक्षण क्षेत्राला लागलेले कलंक पुसून टाकावेत. हीच गुरुपौर्णिमेनिमित्त आपल्याला नम्र प्रार्थना आहे..आणि गुळवे सरांना गुरुपौर्णिमेनिमित्त माझ्यातील लेखक व कवी जागा केल्याबद्दल त्यांचा शिष्य म्हणून त्यांचे खूप खूप आभार आणि त्यांना कोटी कोटी वंदन करतो...

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# पोलीस उपनिरीक्षकांचा सत्कार




**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील टेंभुर्णी पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक श्री देशमाने यांच्या जागेवर नवीन आलेले बी.एस.खार्डे यांचा सत्कार देळेगव्हाण ग्राम स्थांच्या वतीने करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी देळेगव्हाण ग्रामपंचायत सदस्य युवा नेते सुनील बनकर, पिनू बनकर, व पोलीस कर्मचारी श्री सचीन तिडके उपस्थित होते.

यावेळी युवा नेते बनकर म्हणाले की, टेंभुर्णी पोलीस ठाण्यातील ठाणेदारासह कर्मचारी कुठल्याही गुन्ह्यात राजकीय दुजाभाव करत नसल्याचे आजपर्यंत दिसून आले आहे. सर्व पोलीस कर्मचारी शिस्तप्रिय असून सर्वांना समान वागणूक देत असल्याचे स्पष्ट होत आहे. यावेळी श्री खार्डे म्हणाले की,टेंभुर्णी परिसरात कायम शांतता प्रस्थापित करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असून टेंभुर्णी पोलीस ठाणे हद्दीतील सर्व तरुणांनी गुन्ह्याच्या काम तात पोलिसांना सहकार्य करावे अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# जाफ्राबाद बोरगाव मार्गे बुलढाणा बस सेवा करा

## शेतकरी पुत्रांच्या वतीने आगार प्रमुख यांना निवेदन

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील बोरगाव बु मार्गे बुलढाणा ही बस सेवा अगोदर सुरू होती. पण कोरोना च्या आधी पासून अचानक बस सेवा बंद केल्याने नागरिक,कामगार विद्यार्थींनी नाराजी व्यक्त केली होती.ही बस सेवा पुर्ववत सुरू करावी अशी मागणी शेतकरी पुत्र यांनी निवेदनाच्या माध्यमातून आगार व्यवस्थापक प्रमुख यांच्या कडे केली आहे.

त्यांनी निवेदन म्हटले आहे की, कित्येक वर्षापासून बंद असलेली जाफ्राबाद ते बोरगाव मार्गे बुलढाणा ही बस सेवा पुन्हा सुरू करून प्रवाशांना होणारा शारीरिक व मानसिक त्रास कमी करावा. खरंतर ज्यावेळी बोरगाव मार्गे बुलढाणा ही बस सेवा सुरू होती त्यावेळी आपल्या जाफ्राबाद आगार ला उत्पन्नात वाढ व प्रवाशांचा मिळणारा प्रतिसाद खूप मोठ्या प्रमाणामध्ये होता. पण काही कारणास्तव ही बस सेवा बंद झाल्याने प्रवाशांचे खूप हाल होत आहे व विशेष म्हणजे बोरगाव बु मार्गे बुलढाणा हे अंतर बाकीच्या मार्गांपेक्षा अंतर कमी असल्याने प्रवाशांच्या सोयीसाठी खुप महत्वाचे ठरणार आहे.तरी मागच्या काही वर्षांपासून बंद असलेली बोरगाव बु मार्गे बुलढाणा ही बस सेवा आपण लवकरात लवकर सुरू करावी ही विनंती अशी मागणी निवेदनाच्या माध्यमातून तसेच प्रवाशांकडून जोर धरू लागली आहे. यावेळी, शेतकरी पुत्र हर्षल फदाट, सुनील फदाट, गोपाल बर्हाटे यांची उपस्थित होते.

### बुलडाणा जाण्यासाठी जवळचा मार्ग

बोरगाव बु हे मराठवाड्यातील शेवटचे गाव असुन लगतच विदर्भातील बुलडाणा जिल्हाची हद्द सुरू होते त्यामुळे या मार्गावरुन प्रवास केल्याच बाकीच्या मार्गांपेक्षा अंतर कमी असल्याने काही खासगी वाहतूक याच बोरगाव मार्गे बुलढाणा या रस्त्याने प्रवास करतात.

मागच्या काही वर्षांपासून जाफ्राबाद -बोरगाव मार्गे बुलढाणा ही बससेवा सुरू होती. प्रवासांचा ही चांगला प्रतिसाद मिळत होता.पण अचानक महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने ही बससेवा बंद केली.त्यामुळे महिला,विद्यार्थी,शेतकरी व वयोवृद्ध व्यक्तींना नाहक त्रास सहन करावा लागला.बोरगाव मार्गे बुलढाणा हे अंतर बाकीच्या मार्गांपेक्षा कमी असल्याने विद्यार्थ्यांसह नोकरदार वर्ग, शेतकरी व कामगारांना वेळेत पोहोचणं शक्य होणार आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने बोरगाव मार्गे बुलढाणा ही बससेवा परत सुरू करावी. **- हर्षल मोतीराम फदाट (शेतकरी पुत्र)**



# किमान वेतन २६ हजार रु द्या; महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक मागे घ्या

## जालना जिल्ह्यात सिटूच्या नेतृत्वात संप

**जालना । प्रतिनिधी -** केंद्रीय कामगार संघटनांनी ९ जुलै रोजी देशपातळीवर संप पुकारला त्या संपाचा भाग म्हणून जालना जिल्ह्यात अंगणवाडी कर्मचारी, आशा व गटप्रवर्तक, शालेय पोषण आहार कामगार, महानगरपालिकेतील सफाई कामगार, वैद्यकीय प्रतिनिधी, रोजगार सेवक , शेतमजूर इत्यादी कर्मचारी सहभागी झाले होते सिटू संघटनेच्या वतीने जिल्हा अधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून जिल्हा परिषदेवर योजना कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी मोर्चा काढण्यात आला. यावेळी ज्येष्ठ कामगार नेते अण्णा सावंत, मधुकर मोकळे, डॉ.सुनंदा तिडके, मारुती खंदारे, सरिता शर्मा, ड.अनिल मिसाळ, संजय खंडागळे, जनार्धन मुळे, वैजनाथ लोंढे यांनी या मोर्चाला मार्गदर्शन केले व त्यांनी भाषणामध्ये महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक व कामगार विरोधी चार श्रम संहिता यांना कडाडून विरोध केला व हे सर्वसामान्य जनता व कामगारांसाठी किती घातक आहे हे भाषणातून कामगारांसमोर मांडले. स्थानिक प्रश्नांबाबत जिल्हाधिकारी यांना संघटनेच्या शिष्टमंडळाने निवेदन दिले महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांसंदर्भात जिल्हाधिकारी यांच्यासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. जालना महानगरपालिका मधील कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन दिले जात नाही, त्यांना पीएफ मिळत नाही, त्यांचा पगार बँकेतून होत नाही या सगळ्या गंभीर बाबीकडे जिल्हाधिकारी यांचे लक्ष वेधले असता या संदर्भात महानगरपालिका व्यवस्थापनासोबत लवकरच बैठक लावून कामगारांचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन जिल्हाधिकारी यांनी दिले.

त्याचबरोबर मोर्चा जिल्हा परिषदेच्या आवारात गेल्यानंतर मोर्चाचे शिष्टमंडळ जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती कोरे मॅडम यांना भेटण्यासाठी गेले त्यावेळी अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली अंगणवाडीचा पगार नियमित होत नाही. मार्चमध्ये झालेली अंगणवाडी सेविका मदतनीस पदासाठी झालेल्या भरतीमध्ये मोठ्या गैरव्यवहार झालेला आहे. वेळेवर झाला आहे. याची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी ही लावून धरली असता चौकशी करण्याचे आश्वासन देखील अधिकाऱ्यांनी दिले. त्याचबरोबर अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारावर पांघरून घालण्यासाठी अंगणवाडी सेविका पुष्पा शेवाळे यांना कार्यमुक्त केले आहे. त्यामुळे स्वीकारले व त्यांच्या मागण्या ज्या शासन स्तरावर आहेत त्याचा प्रस्ताव आम्ही शासनाला पाठवून आणि आमच्या पातळीवरची काही प्रश्न आहेत ते आम्ही त्वरित निकाली काढू असे आश्वासने त्यांनी दिले. आशा केली. यावेळी कांचन वाहुळे, हरिश्चंद्र लोखंडे भगवान कोळे, संतोष पाटोळे, बाबासाहेब पाटोळे, मीरा बोराडे, संगीता वायखिंडे,उषा तगे, सुलभा पवार, यमुना गिरी, स्वाती दुधाणे, सुजाता छडीदार, सुनंदा पवार, छाया



त्या उपोषणाला बसल्या आहेत. प्रकरणाची एका हप्त्यामध्ये चौकशी करून त्यांना कामावर घेण्यात येईल असे आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्याचे ठरले. शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन स्वतः शिक्षणाधिकारी मॅडम यांनी आंदोलकांच्या ठिकाणी येऊन कर्मचाऱ्यांचे निवेदन जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याला देऊन त्यांचा मागील सहा महिन्याचे मानधन अद्याप पर्यंत झालेले नाही ते लवकरच देण्यात यावे व इतर मागण्या करण्यात आल्या यावेळी जिल्हा परिषद आवारात सभा घेऊन सरकारच्या कामगार विरोधी धोरणाचा समाचार घेत घोषणाबाजी जैस्वाल, उषा बनकर,शेषराव कान्हेरे यादवराव डीघे, मीरा देशमुख गयाबाई वाघ, आशा रगडे, कोमल पिठोरे , छाया देशमुख, संजय जगधने, मदन एखंडे, कृष्णा काटकर, योगेश फुसे, प्रतिभा आहेर, अशोक साळवे, गोविंद चांदगुडे यांच्यासह मोठ्याप्रमाणात कामगारांची उपस्थिती होती.

# कनिष्ठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी पदावर अमोल बोरकर रुजू

**जालना । प्रतिनिधी -** शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे आयुक्त यांच्या आदेशान्वये सेवाज्येष्ठतेनुसार अमोल बोरकर यांची कनिष्ठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी पदी पदोन्नतीने जालना येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र कार्यालयात नियुक्ती करण्यात आली आहे. कनिष्ठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी अमोल बोरकर यांनी जालना येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात हजर होवून बुधवार दि. ९ जुलै २०२५ रोजी मध्यान्ह पुर्व कर्तव्यावर रुजु झाले आहेत.



यापुर्वी त्यांनी नांदेड, छत्रपती संभाजीनगर आणि जालना येथे आपली सेवा निष्ठेने व जबाबदारीने पार पाडलेली आहे. त्यांच्या पदोन्नतीबद्दल अधिकारी-कर्मचारी, मित्र परिवार आणि नातेवाईक यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव सुरु आहे.

# राज्य शासनाच्या 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४'साठी प्रवेशिका पाठविण्याकरिता १९ जुलै पर्यंत मुदतवाढ

**जालना । प्रतिनिधी -** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी दि. १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दि. ३१ जानेवारी, २०२५ असा होता. आता या पुरस्कारासाठी प्रवेशिका मागविण्याकरिता १९ जुलै, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२, येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने http://dgipr.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**झाडे लावा झाडे जगवा**

## वाचकांचे मनोगत

# अपात्र डॉक्टरांचा गोरख धंदा थांबवणार कोण ?

पावसाळा सुरू झाला की साथीचे आजार वाढतात.तेव्हा रुग्ण उपचाराकरिता आपल्याच घराच्या आसपास असलेल्या दवाखान्यात जातात. ज्या दवाखान्यात गेले आहेत तो डॉक्टर शासन मान्य वैद्यकीय पदवी शिक्षण घेतलेला आहे की नाही याची चौकशी कोणी करीत नाही.जी औषधे डॉक्टर देतात ती उपचारादरम्यान घेतात. काही वेळेस असेही होते तीन - चार वेळी जाऊन औषधे आजार बरा होत नाही म्हणून रुग्ण स्वतःच डॉक्टर बदलतो किंवा शासकीय रुग्णालयात जातो. तेव्हा त्याच्या उपचारादरम्यान तब्येतीत सुधारणा होते.याचाच दुसरा अर्थ आधी ज्या डॉक्टरकडे औषधोपचार घेतले ते योग्य नव्हते.अशा डॉक्टरकडे कोणतेही वैद्यकीय शिक्षण नसते.ते आपल्या दवाखान्याबाहेर आपल्या नावाचा फलक लावत नाहीत. बाहेरुन औषधे घेण्यासाठी त्यांचे लेटर हेड नसते,त्यांचे व्हिजिटिंग कार्ड नसते, अशांची महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिलकडे नोंदणी नसते.



तरीही लोकांची गरज बघून आपला गोरख धंद्या सुरू करतात. विशेषतः गलिच्छ वस्ती विभागात किंवा अविकसित विभागात दवाखाने सुरू करतात तेथील स्थानिक पुढाऱ्यांशी सलगी वाढवतात. काही अडचण आलीच तर त्यांचा उपयोग करून घेतात. अपात्र, बोगस डॉक्टरांच्या प्रतापामुळे अनेक रुग्णांना प्राण गमवावे असल्याचे उघड झालेले आहे.महाराष्ट्र राज्य सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित वैद्यकीय सेवा येते.त्यांनीच अपात्र डॉक्टरांवर कायदेशीर कारवाई केली पाहिजे.शहर स्तरावरील महानगरपालिकांच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने बोगस डॉक्टरांना शोधून काढून कायमचा बंदोबस्त केला पाहीजे.तेव्हाच सामान्य रुग्णांचे प्राण वाचतील.

**महादेव गोळवसकर**
**कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

# वीज नियामक आयोगाच्या दरवाढी विरोधात तीव्र नाराजी

## व्यापारी, औद्योगिक व सोलार वापरकर्त्यांच्या संघटनांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** राज्य विद्युत वितरण कंपनी मार्फत प्रस्तावित करण्यात आलेल्या वीज दरवाढीच्या विरोधात जालना येथील विविध औद्योगिक, व्यापारी आणि व्यावसायिक संघटनांनी जिल्हाधिकार्यांकडे एकत्रितपणे निवेदन सादर केले.

निवेदनात नमूद केले आहे की, महाराष्ट्र वीज नियामक आयोगकडे ने २०२५-२८ या कालावधीसाठी वीज दरवाढ प्रस्ताव दाखल केला आहे. या प्रस्तावानुसार, १ एप्रिल २०२५ पासून दरामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.

प्रस्तावित दरवाढीमध्ये घरगुती वीज ग्राहकांसाठी १०१-३०० युनिट - १५.१४ टक्के, ३०१-५०० युनिट - १९.८७ टक्के, ५०० युनिटपेक्षा जास्त - २३.३७ टक्के, त्याचबरोबर व्यावसायिक ग्राहकांसाठी २० केव्ही पर्यंत - ३४.८४ टक्के, २० ते ५० केव्ही २४.८२ टक्के तर ५० केव्ही पेक्षा जास्त २२ टक्के, औद्योगिक ग्राहकांसाठी २० केव्ही पर्यंत ७.२१ टक्के, २० केव्ही पेक्षा जास्त १६ टक्के, उच्चदाब ग्राहकांसाठी औद्योगिक - १६ टक्के वाढ, व्यावसायिक - ५१.५१ टक्के वाढ करण्यात आली आहे. या दरवाढीस संघटनांचा आक्षेप घेतला असून, ही दरवाढ अतिशय अन्यायकारक असून त्यामुळे लघुउद्योग, व्यापारी व सामान्य ग्राहक यांच्यावर मोठा आर्थिक बोजा येणार आहे. यामुळे उत्पादन खर्च वाढून स्पर्धात्मकता घटेल, तसेच उद्योग बंद पडण्याची शक्यता निर्माण होणार असल्याचेही निवेदनात नमूद केले आहे.

संघटनांच्यावतीने शासनाकडे प्रस्तावित दरवाढ तातडीने मागे घेतली जावी आणि याबाबत व्यापारी, औद्योगिक व ग्राहक प्रतिनिधींशी चर्चा करून निर्णय घेतला जावा, असेही नमूद करण्यात आले आहे. निवेदनावर लघुउद्योग भारतीचे पंकज कासलीवाल, भूषण कुलकर्णी, सतीश पंच, डॉ. चारुस्मिता हवालदार, विष्णुकुमार चेचानी, मयूर भांगडिया, चंदन लव्हाडे आदींच्या सह्या आहेत.

पान १ वरुन

### अंशतः अनुदानित ...

मारोतराव देशमुख विद्यालय टेंभुर्णी, जाणता राजा माध्यमिक विद्यालय अकोला देव सह जाफराबाद तालुका,जालना जिल्हा आणि राज्यभरातून हजारोच्या संख्येने शिक्षक शिक्षिका उपस्थित असल्याचे या आंदोलनाचे समन्वयक सदानंद लोखंडे आणि ज्ञानेश चव्हाण यांनी पार्श्वभूमीशी बोलताना सांगितले.

### वीजेचे जाळे ...

आहे त्यामध्ये मंठा तालुक्यातील मंठा उपविभाग येथे ४५ ठिकाणी तर परतुर उपविभाग येथे ७५ ठिकाणी ६३ रोहित्र १०० घत क्षमता वाढ, मंठा शहर येथे ०६ ठिकाणी १०० घत चे २०० घत रोहित्र क्षमता वाढ, मंठा तालुक्यातील पांगरी खुर्द व परतुर तालुक्यातील रायगव्हाण या ठिकाणी नवीन ३३ केव्ही, परतुर तालुक्यातील आंबा आणि जालना तालुक्यातील नेर व सेवली येथे नवीन ५ चत पॉवर ट्रान्सफॉर्मर ची मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. शेतकऱ्यांच्या कृषिपंपाना दिवसा वीज मिळावी, म्हणून मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सौर कृषीवाहिनी योजना आणली असून त्याच्या दुसऱ्या टप्प्यात तब्बल १ लाख ७२ हजार कृषिपंपाना दिवसा वीज उपलब्ध करून दिली जाणार आहे. ऊर्जा विभागाच्या वतीने १,३७१ वीज उपकेंद्रांचे सौरऊर्जिकरण करण्यासाठी ९,१५१ मेगावॅट क्षमतेचा सौरप्रकल्प उभारण्याचे काम सुरू असून अनेक ठिकाणी हे प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहेत. त्यासाठी तब्बल ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार असून यातून ३० हजार रोजगार निर्मिती होणार आहे. असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले.

३३ केव्ही ही विद्युत शक्ती वहनाची आणि वितरणाची एक सामान्य पातळी आहे. ही पातळी उपकेंद्रांमध्ये वापरली जाते, जिथे उच्च व्होल्टेज कमी व्होल्टेजमध्ये रूपांतरित केले जाते, ज्यामुळे ते घरांसाठी, उद्योगांसाठी आणि इतर उपयोगांसाठी योग्य ठरते. ३३ केव्ही उपकेंद्रे उच्च व्होल्टेजला (उदा. १३२ केव्ही) कमी व्होल्टेजमध्ये (उदा. ११ केव्ही) रूपांतरित करतात, जे वितरण नेटवर्कसाठी आवश्यक आहे. ३३ केव्ही ही वितरण पातळी म्हणून वापरली जाते, जिथे ती वीज ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ११ केव्ही किंवा इतर कमी व्होल्टेजमध्ये रूपांतरित केली जाते. ३३ केव्ही उपकेंद्रांमध्ये, कॅपेसिटर देखील वापरल्या जाते, ज्यामुळे पॉवर फॅक्टर सुधारला जातो आणि ऊर्जा कार्यक्षमतेत अधिक वाढ होते असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळेस स्पष्ट केले.

### जालना व परभणी ...

हाताने मैला वाहणारी प्रथा रोखण्यासाठी आणि संबंधित कायद्याच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असे त्यांचे मत आहे. आयुक्त एडके यांनी या मागण्यांवर सकारात्मक दृष्टिकोन दर्शवला असून, प्रशिक्षण केंद्र आणि व्हिजिलन्स कमिटीच्या प्रस्तावाबाबत पुढील कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्याचे आश्वासन दिले. या प्रसंगी प्रोफेसर्स फोरम आणि सजग नागरी मंचचे इतर सहकारी उपस्थित होते.या मागण्या प्रत्यक्षात आल्यास जालना आणि परभणी जिल्ह्यातील तरुणांना पोलीस सेवेत सामील होण्याची संधी मिळेल आणि मॅन्युअल स्कॅव्हेंजिंगविरोधी कायद्याची अंमलबजावणी अधिक प्रभावी होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# विद्युत वापरावरील बंधनाला व्यापाऱ्यांचा विरोध

## विविध मागण्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** सोलार पासून बनलेल्या विद्युत वापरावर बंधने आणून राज्यातील व्यापार उद्योग देशोधडीला लावण्याचा महावितरणचा कट कारस्थान. महाराष्ट्र विद्युत नियमक आयोगाने काढलेल्या सोलर विद्युत वापरावर आणलेल्या बंधनाच्या विरोधात जालना जिल्हा व्यापारी महासंघ व सोलार असोसिएशन यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन या ऑर्डरला विरोध दर्शवलेला आहे.

३ जुलै ला महाराष्ट्र विद्युत न् नियामक आयोग यांनी एक ऑर्डर काढून निवासी सोलार विद्युत वापरणाऱ्यांना वगळून दहा किलो वॅट पेक्षा जास्त सोलार सिस्टीम व्यापारी किंवा औद्योगिक क्षेत्रात बसवलेले आहेत त्यांनी त्या सोलार सिस्टिमने जनरेट केलेल्या विद्युत युनिट पैकी फक्त दिवसा १२ घंटे सकाळी सहा ते संध्याकाळी सहा पर्यंत पर्यंतच उत्पादन झालेली विद्युत वापरता येईल व त्यानंतर संध्याकाळी सहा ते दुसऱ्या दिवशी सकाळी सहा पर्यंत वापरात येणाऱ्या युनिट चे दर महावितरण महावितरण आपल्या दरा प्रमाणे लावणार आहे. विद्युत नियमक आयोगाचा हा ऑर्डर सर्व व्यापारी व औद्योगिक ग्राहकावर अन्याय करणार आहे. तसेच पंतप्रधानाचा ड्रीम प्रकल्प ग्रीन एनर्जी पॉलिसीला खीळ घालणार आहे. वस्तूच्या किमती आटोक्यात राहाव्या म्हणून महाराष्ट्रातील व्यापारी उद्योजकांनी सोलार सिस्टिम बँकेचे कर्ज इन्स्टॉलमेंटमध्ये काढून आपल्या प्रतिष्ठान वर बसवलेली आहे. पहिलेच महाराष्ट्र राज्यात विद्युत दर आजूबाजूच्या राज्यात असणाऱ्या दरापेक्षा जास्तीचे आहे.इतर राज्यापेक्षा महाराष्ट्रात विद्युत दर जास्त असल्यामुळे व्यापारी व उद्योजक वर्गांचा उत्पादनाचा खर्चही वाढत असल्यामुळे इतर राज्यात आपले उत्पादन स्पर्धेत टिकत नाही. महाराष्ट्र विद्युत न्यायमक आयोगाने अशी ऑर्डर काढून येथील उद्योग व्यापारांचे कंबर्डे मोडण्याचा विचार केलेला दिसतो. असेच विद्युत जर वाढत राहिले तर राज्यातील व्यापार उद्योग महाराष्ट्राबाहेर जाऊन सरकारच्या महसूलला फटका बसून राज्यात बेरोजगारी वाढण्याची शक्यता आहे. तसेच बेरोजगारीही काम मिळण्यापासून वंचित राहतील. सरकारला आमची विनंती आहे की राज्यातील व्यापार उद्योग वाचवायची असेल तर महाराष्ट्र विद्युत नियमक आयोगाने काढलेल्या ऑर्डर ला स्थगिती देऊन व्यापारी उद्योजकांच्या हिताचा निर्णय घ्यावा. स्थगिती दिली नाही तर व्यापारी वर्ग फार मोठे आंदोलन उभे करतील. यावेळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत सहानी मराठवाडा चेंबरचे महासचिव श्याम लोया, कॅटचे सतीश पंच, कटलरी असोसिएशनचे हस्तीमल बंब सोलार असोसिएशनचे भुतेकर, मयूर बा भांगडिया व जवळपास १०० सोलार असोसिएशनचे सदस्य उपस्थित होते.

अशा आदेशामुळे राज्यातील व्यापारी व उद्योजक देशोधडीला लागतील. सरकार ग्रीन एनर्जी ला प्रोत्साहन देत असताना असे बंधन आणले तर ग्रीन एनर्जी साठी लावणारे सोलर प्लांट इथून पुढे उद्योजक लावणार नाही व त्यामुळे प्रदूषण वाढण्याची शक्यता आहे. लाखो रुपये खर्च करून राज्यातील व्यापारी व उद्योजकांनी आपल्या प्रतिष्ठान वर सोलर प्लांट बसवलेले आहे सरकारने असा अन्यायकारक निर्णय घेतल्यामुळे अतोनात नुकसान होणार असून सरकारने त्या आदेशात स्थगिती द्यावी अशी आमची विनंती आहे. नसता आम्हाला जालना जिल्हा व्यापारी महासंघ व मराठवाडा चेंबरच्या माध्यमातून मोठे आंदोलन उभे करावे लागेल याची सरकारने नोंद घ्यावी.

**- विनीत सहानी अध्यक्ष जालना जिल्हा व्यापारी महासंघ.**

महाराष्ट्र विद्युत नियमक आयोगाने सोलार वापरण्यावर आणलेल्या बंधना बाबत काढलेला आदेश हा सर्व व्यापारी व उद्योजकावर अन्याय करणार आहे. तसेच पंतप्रधानाच्या ग्रीन एनर्जी ला प्रोत्साहन देण्याच्या पॉलिसीला तिलांजली देणारा आहे. राज्यातील सर्वच व्यापारी व उद्योजक या अन्याय करणाऱ्या आदेशाला एकजूट होऊन महाराष्ट्र चेंबर व मराठवाड्याचे चेंबरच्या माध्यमातून विरोध करतील. सरकारने ही सर्व व्यापारी वर्गांचा हिताचा विचार करून या आदेशास स्थगिती द्यावी. विद्युत दर वाढल्याने राज्यातील व्यापार ,उद्योगा त उत्पादन उद्योग करत असलेल्या वस्तूंची किंमत वाढेल त्यामुळे इतर राज्यात विद्युत दर कमी असल्यामुळे त्यांच्या स्पर्धेत आपण टिकणार नाही व उद्योगधंदे इतर राज्यात स्थलांतर होतील व त्यामुळे राज्यात बेरोजगारी सुद्धा वाढेल याची सरकारने नोंद घ्यावी.

**- श्याम लोया, महासचिव मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्स**

# युवा कार्य प्रशिक्षणार्थी बेरोजगारांचा छत्री मोर्चाला हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे

## प्रा. गोपाल जाधव यांचे आवाहन

**मंठा । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत बेरोजगार युवकांना प्रशिक्षणार्थी संधी उपलब्ध करून दिली होती, विविध शासकीय निमशासकीय विभागात हे सर्व युवक कार्यरत असून, आपले कर्तव्य आणि जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय उत्तम प्रकारे पार पाडत आहेत, दरम्यान सर्व युवकांना शासकीय कामाचा अनुभव आणि मार्गदर्शन उत्तम प्रकारे मिळत असल्याचे युवकांचे म्हणणे आहे परंतु या प्रशिक्षणार्थचा कालावधी हा मागील अधिवेशनात ०६ + ०५ असा ११ महिन्याचा करण्यात आला होता येत्या दोन महिन्यात काही प्रशिक्षणार्थीचा हा कालावधी पूर्ण होणार आहे, त्यानंतर हे सर्व प्रशिक्षणार्थी पुन्हा बेरोजगार होणार असल्याची



भीती या युवकांमध्ये आहे. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री तसेच मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी जाहीर केल्याप्रमाणे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी ज्या अस्थापानेत कार्यरत आहेत तिथेच त्यांना कायम करण्यात येईल असे आश्वासन दिले होते, याचीच आठवण करून देण्यासाठी आणि इतर मागण्यांकडे देवेंद्र फडणवीस सरकारचे लक्ष वेधण्याकरिता माजी खासदार हरिभाऊ राठोड,लोकनेते बालाजी पाटील चाकूरकर, अनुप चव्हाण, ह.भ.प.तुकाराम महाराज,प्रकाशभाऊ साबळे यांच्या अध्यक्षतेखाली १४ जुलै २०२५ रोजी १०.०० वाजता आझाद मैदान, मुंबई येथे छत्री महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चामध्ये महाराष्ट्रभरातून हजारो युवक सहभागी व्हावे, आसे आवाहन युवा प्रशिक्षणार्थी प्रा.गोपाल उध्दवराव जाधव जालना जिल्हा युवा प्रशिक्षणार्थी संघटक यांनी केले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.